8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांच्या कार्याचा आदर्श घेत वंचितांच्या कल्याणासाठी काम करणार - मुख्यमंत्री फडणवीस

### श्रीक्षेत्र चौंडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती सोहळा संपन्न

**अहिल्यानगर -** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य व विचार आजही राज्यव्यवस्थेला मार्गदर्शक आहेत. अहिल्यादेवी होळकर यांनी न्यायदानाची आदर्श व्यवस्था भक्कमपणे उभी केली. अन्यायग्रस्तांना न्याय देण्याचे कार्य त्यांनी केले. त्यांच्या प्रजाहितदक्ष, राज्यकारभाराचा आदर्श समोर ठेऊन राज्य शासन देखील वंचितांच्या कल्याणासाठी काम करेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

श्रीक्षेत्र चौंडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती सोहळ्याप्रसंगी मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, इतर मागासवर्गीय बहुजन कल्याणमंत्री अतुल सावे, क्रीडा व युवक कल्याणमंत्री दत्तात्रय भरणे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अहिल्यादेवींनी २८ वर्षं राज्यकारभार केला. त्यांनी केवळ राजकीय नव्हे तर सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात क्रांती घडवली. मंदिरांचे पुनरुज्जीवन, घाटांचे बांधकाम, धर्मशाळांची उभारणी, गरीब जनतेसाठी पाणीपुरवठ्याची यंत्रणा आणि महिला सक्षमीकरणाचे कार्य त्यांनी अत्यंत समर्पित वृत्तीने केले.

अहिल्यादेवी होळकर यांनी काशी, अयोध्या, मथुरा, पंढरपूर, नाशिक, जेजुरीसह



देशभरातील धार्मिक स्थळांचा जीर्णोद्धार त्यांच्या स्वतः च्या निधीतून केला. त्यांनी सोमनाथ येथील मंदिर नव्याने बांधले. घाट, मंदिरे बांधताना, दानपुण्य करतांना सरकारी तिजोरीतून खर्च न करता स्वतःच्या संपत्तीतून खर्च केला. एवढी श्रीमंती असतानाही त्या योग्याप्रमाणे जीवन त्या साधेपणाने जीवन जगल्या. त्यांनी स्वतःसाठी धन खर्च केले नाही, तर समाजाच्या कल्याणासाठी खर्च केले, म्हणून त्या 'लोकमाता' ठरल्या.

**महिला सक्षमीकरण आणि आदर्श न्यायदान**

गोरगरिबांना रोजगार मिळवून देण्यासाठी अहिल्यादेवी होळकर यांनी माहेश्वर येथे त्यांनी एक मोठे वस्त्रउद्योग केंद्र उभारले, तेथे माहेश्वरी वस्त्र तयार होऊ लागले. त्यांनी एक समृद्ध अर्थव्यवस्था उभी केली. महिला सैनिकांची स्वतंत्र तुकडी निर्माण करणाऱ्या त्या पहिल्या महिला शासक होत्या. त्यांच्या सैन्यदलात शिस्त होती, कौशल्य होतं, आणि युद्धसज्जतेसाठी त्यांनी स्वदेशी तोफांचं उत्पादनही सुरू केलं. न्यायपद्धतीमध्ये त्यांचा दृष्टिकोन अत्यंत प्रगतीशील होता. अहिल्यादेवींची आदर्श न्यायदानाची व्यवस्था भक्कमपणे उभी केली. अन्यायग्रस्तांना न्याय देण्याचे कार्य त्यांनी केले. सर्वसामान्यासारखे न्यायदान करतांना हुंडाबंदी केली. महिलांचे जीवन समृद्ध करण्याचे कार्य त्यांनी केले.

**श्रीक्षेत्र चौंडी विकासासाठी ६८१ कोटी रुपयांचा विकास आराखडा**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे चरित्र, कार्य आणि आदर्श आज ३०० वर्षांनंतरही तितकंच प्रभावी आणि प्रेरणादायी आहे. त्यांच्या जन्म त्रिशताब्दी निमित्ताने शासनाने ६८१ कोटी रुपयांचा विकास आराखडा तयार केला आहे. त्यांच्या नावाने एक भव्य स्मारक, महिला सक्षमीकरणासाठी 'आदिशक्ती अभियान', आणि त्यांच्यावर आधारित एक बहुभाषिक चित्रपट तयार करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे. या माध्यमातून त्यांचे कार्य देशभरात पोहोचविले जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**अहिल्यादेवी होळकर यांचे प्रजाहिताचे धोरण राबविण्यावर शासनाचा भर - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांचे जन्मस्थान चौंडी मराठी संस्कृतीचे जागृत देवस्थान आहे. लोककल्याणकारी राज्य, सुराज्य जगाला दाखविण्याचे काम अहिल्यादेवींनी केले. अहिल्यादेवींनी सर्वसामान्य माणसांच्या विकासाचे काम केले. त्यांनी धर्मरक्षणासाठी आयुष्य समर्पित केले. महिलांसाठी सैनिक तुकडी सुरू करण्याची त्यांच्याकडे दूरदृष्टी होती. त्यांनी महिलांना अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची शिकवण दिली आहे.

अहिल्यादेवी निष्पक्ष व न्यायप्रिय राजमाता होत्या. प्रजेसाठी रोजगार निर्माण करण्याची दूरदृष्टी अहिल्यादेवींकडे होती. त्यांनी रस्ते, पूल व घाट बांधले. अहिल्यादेवींचे प्रजाहिताचे धोरण आज शासन राबवित आहे. याच व्यासपीठावरून जिल्ह्याचे नाव अहिल्यानगर करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला होता. अहिल्यादेवी होळकरांच्या आदर्शावर शासन काम करत आहे. चौंडी विकासासाठी जो काही आवश्यक पान ३ वर

## देळेगव्हाण येथील अनोखे आंदोलन प्रशासनाच्या आश्वासनानंतर मागे



**जाफराबाद । प्रतिनिधी -** तालुक्यातील देळेगव्हाण येथील शेतकरी सुखदेव भीमराव कापसे हे आपल्या शेतात पावसाचे पाणी जात असल्यामुळे सकाळी ९ वाजता साचलेल्या पाण्यात जाऊन उपोषणाला बसले होते. त्यामुळे परिसरात बघ्यांची मोठी गर्दी जमा झाली होती. अखेर टेंभुर्णी पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरिक्षक सचिन खामगळ यांनी घटनास्थळी जाऊन उपोषकर्त्यांना विनंती केली. त्यानंतर उपोषणकर्ते पाण्यातून बाहेर आले.

जाफराबाद तालुक्यातील देळेगव्हाण-सातेफळ रस्त्याचे काम सुरू आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने दोन्ही बाजूने मोठी नाली काढून दिली आहे. मात्र, एका शेजारी असलेल्या शेतकऱ्याने ही नाली माती टाकून अडविल्यामुळे कापसे यांच्या शेतात पावसाचे पाणी जात आहे. मंगळवारी रात्री मोठ्या प्रमाणात पान ३ वर

## भव्य संत संमेलनाचे आयोजन

**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** मराठवाडा आणि विदर्भ यासह संपूर्ण महाराष्ट्रामध्ये सकल संतांचे विचार कीर्तन प्रवचनाच्या माध्यमातून समाजातील तळागाळापर्यंत पोहोचवणारे ह. भ.प.गुरुवर्य डॉ. अनिरुद्धजी महाराज क्षीरसागर उर्फ नित्यानंद स्वामी,यांच्या ६१ व्या अभिष्टचिंतन सोहळ्याच्या निमित्ताने,भव्य संत संमेलनाचे आयोजन केलेले आहे. जालना सिंदखेडराजा रोड वरती मराठवाडा व विदर्भाच्या सीमेवर श्रीक्षेत्र मुक्तधाम आश्रम सावरगाव माळ या ठिकाणी हा कार्यक्रम संपन्न होणार आहे. ह. भ.प. डॉ.यशोधन महाराज साखरे (साधकाश्रम आळंदी देवाची) यांच्या अध्यक्षतेखाली हा



कार्यक्रम संपन्न होणार असून विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर चे सदस्य ह.भ.प. श्री प्रकाश महाराज जवंजाळ हे या कार्यक्रमाचे उद्घाटन करणार आहेत. ह .भ. प .गुरुवर्य डॉ. भगवान बाबा आनंदगडकर, ज्ञानेश्वर माऊलींचे वंशपरंपरागत चोपदार ह. भ. प .पांडुरंग माऊली चोपदार, ह. भ. प. हरि चैतन्य स्वामी , ह. भ. प. श्रीकृष्ण चैतन्य स्वामी, पान ३ वर

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त जालना येथे मॅरेथॉन व वॉकाथॉन उत्साहात

## अहिल्याबाईंचे कार्य आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे - रावसाहेब दानवे

**जालना । प्रतिनिधी -** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पक्ष, जालना महानगरतर्फे आज सकाळी भव्य मॅरेथॉन व वॉकाथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. पहाटे ६ वाजता सुरू झालेल्या या उपक्रमाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या स्पर्धेमध्ये महिलांसह पुरुष, युवक-युवती व लहान मुलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली असून, अहिल्यादेवींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी भाजपाचे जेष्ठ नेते व माजी केंद्रीय मंत्री



रावसाहेब दानवे, जालना ग्रा. जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे, जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांची प्रमुख उपस्थिती होती.

माजी खा दानवे यांनी याप्रसंगी बोलतांना अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. अहिल्यादेवी होळकर या केवळ एक आदर्श स्त्री प्रशासक नव्हत्या, तर त्यांनी आपल्या कार्यातून सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता आणि स्त्री सबलीकरणाचे मूर्त उदाहरण निर्माण केले, असे त्यांनी सांगितले. त्यांच्या कार्यातून आजच्या पिढीने प्रेरणा घेण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांच्या पुढाकाराने आणि आयोजनाखाली भव्य मॅरेथॉन व वॉकाथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या प्रारंभी दानवे यांनी उपस्थितांना थोर समाजसुधारक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनकार्याची थोडक्यात माहिती दिली. त्यांनी अहिल्यादेवींनी केलेल्या सामाजिक कार्य, न्यायप्रिय राज्यकारभार व स्त्रीसशक्तीकरणासाठी दिलेल्या योगदानाचे महत्व पटवून दिले. समाजप्रबोधन आणि जनहित हेच आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे. भाजपकडून भविष्यातही अशा उपक्रमांचे नियोजनबद्ध आयोजन करण्यात येईल, जेणेकरून तरुणाईला प्रेरणा मिळेल आणि सामाजिक भानही निर्माण होईल, असेही त्यांनी यावेळी नमूद केले. कार्यक्रमात सहभागी झालेल्या सर्व नागरिकांचे त्यांनी मन:पूर्वक आभार मानले व अशा सकारात्मक उपक्रमात पुढील काळात अधिक संख्येने सहभागी होण्याचे आवाहनही केले.

या मॅरेथॉन व वॉकाथॉन स्पर्धेमध्ये विविध वयोगटातील नागरिकांनी सहभाग घेतला. विशेषतः महिलांची उपस्थिती प्रेरणादायी व उल्लेखनीय ठरली. महिलांचा उत्साह, जिद्द व सहभाग समाजातील बदलत्या मानसिकतेचे प्रतीक ठरला तसेच फिटनेस ग्रुप्स व आरोग्यप्रेमींनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी भाजप महानगर टीम, कार्यकर्ते, स्वयंसेवक, पोलीस प्रशासन, आरोग्य विभाग व पान ३ वर

## सर्व रोग निदान शिबीर संपन्न



**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील अंबड तालुका येथील शेवगा पाटी परिसरात असलेल्या श्री राजुरेश्वर हॉस्पीटल येथे सर्वरोग निदान शिबीर संपन्न झाले. महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेतंर्गत हे निदान शिबीर आयोजित करण्यात आले होते.

या शिबीरात रुग्णांची रक्तदाब, शुगर, ईसीजी तपासणी करण्यात आली. यावेळी डॉ. गोरक्ष जाधव, डॉ.गंगाधर, डॉ स्वप्निल आपरे यांनी रुग्णांवर उपचार केले. तब्बल ७५ रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला.

## मनपातील दिव्यांग विभागाचे रामेश्वर घोळवे यांची बदली रद्द करा

### दिव्यांग सामाजिक संघटनेचा उद्या मोर्चा

**जालना । प्रतिनिधी -** जालना महानगरपालिकेचे दिव्यांग विभागाचे अधीक्षक रामेश्वर घोळवे यांची जालना महानगरपालिकेतून अंबड नगरपालिकेत बदली झाल्याने सकल दिव्यांग सामाजिक संघटना आक्रमक झाली आहे. रामेश्वर घोळवे यांची बदली रद्द करण्यासाठी येत्या दोन जुन रोजी सकाळी ११ वाजता डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळा मस्तगड गांधी चमन महानगरपालिके पर्यंत मोर्चाचे आयोजन करण्यात आलं आहे रामेश्वर घोळवे दिव्यांगाना समजून सांगणे दिव्यांगाच्या अडीअर्थाने सोडवणे



जालना महानगरपालिकेच्या माध्यमातून दिव्यांगांना न्याय मिळवून देतात अशा व्यक्तीची बदली करणं म्हणजे चुकीचं आहे जालन्यातील दिव्यांगानी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सकल दिवंगत सामाजिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष राहुल मुळे यांनी केले आहे. दिव्यांग पान ३ वर

युवा आदर्श

**मिरवावे ...**

सहज मिळाले यश
डोई घेऊन मिरवावे
आम्ही कर्ते करवते
सुकाणू ते फिरवावे
समर्थनार्थ आपल्या
मेळावे भले भरवावे
मिठाई खर्च दुजांचा
पेढे आपण भरवावे
अपयशां जबाबदार
तिसऱ्याला ठरवावे
अमृता हक्क माझा
विष अन्या जिरवावे
स्वागता पक्ष श्रेष्ठींचे
गल्ली रस्ते सारवावे
मार्ग आखले इतरांने
जरासे फक्त गिरवावे
विषयश्री मी आणली
आपले नेत्या गौरवावे
सन्मानाने जल्लोषात
गादीवर टोळ भैरवावे
आधीचे अपयश सरो
जागेवर सारे निरवावे
आम्हीं केला सूर्योदय
कोंबडे माझे आरवावे

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# संपादकीय

## लालपरीची सेवा...



महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाची जीवनवाहिनी समजल्या जाणाऱ्या एसटीचा आज म्हणजे १ जूनला ७७ वा वाढदिवस आहे. १ जून १९४८ रोजी पुणे - नगर या मार्गावर पहिली एसटी धावली होती. आज एसटी महामंडळाचा विस्तार झाला आहे. गाव तेथे एसटी, रस्ता तिथे एसटी या ब्रीदवाक्यनुसार एसटीचा विस्तार होत गेला. गावागावात आज एसटी पोहचली आहे. एकूण ३१ विभागातून एसटीचे कामकाज केले जाते त्याचप्रमाणे आंतरराज्यीय सेवा देखील पुरवली जातेय. कर्नाटक, गोवा, आंध्रप्रदेश, तेलंगणा, गुजरात, मध्यप्रदेश या राज्यात आज एसटी पोहचली आहे. राज्यातील कोट्यवधी प्रवाशांच्या लाडक्या लालपरीने काळानुसार कात टाकली असून, अनेक बदलही केले आहेत. लालपरीपासून हिरकणी, शिवनेरी, शिवशाही आता विठाई असा एसटीचा चेहरामोहरा बदलत गेला आहे. एसटी म्हणजे केवळ प्रवाशांची वाहतूक एव्हढेच मर्यादित नसून एसटीने सातत्याने सामाजिक बांधिलकी जपली आहे. राज्यावर आलेल्या भूकंप, दुष्काळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीत एसटीने नेहमीच मदतीचा हात पुढे केला आहे. मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात राहता यावे यासाठी एसटीने पुढाकार घेत प्रवासात सवलती दिल्या आहेत. खेड्यापासून शाळा कॉलेजमध्ये जाण्यासाठी विद्यार्थ्यांचे हक्काचे वाहन म्हणजे एसटीच. ग्रामीण भागातील करोडो विद्यार्थ्यांचे शिक्षण केवळ एसटीमुळेच पूर्ण होऊ शकले. म्हणूनच राज्यातील करोडो प्रवाशांच्या मनात एसटी विषयी आदराची भावना आहे. एसटी म्हणजे ग्राम ीण भागासाठी वरदानच आहे. ग्रामीण भागात आजही एसटी हेच दळणवळणाचे प्रमुख साधन आहे. जनतेचा प्रवास सुखकर व्हावा, प्रवाशांना तत्पर आणि वक्तशीर सेवा मिळावी यासाठी एसटीचे कर्मचारी झटत असतात पण गेल्या काही वर्षांपासून एसटी महामंडळ तोट्यात असल्याने एसटी कर्मचाऱ्यांचे भवितव्य अंधकारात बुडाले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून एसटी महामंडळ तोट्यात आहे त्यामुळे महामंडळाने नवीन कर्मचाऱ्यांची भरती केलेली नाही. कंत्राटी पदे भरून एसटीचे खाजगीकरण करण्याचा अट्टाहास केला जात आहे त्यामुळे कर्मचारी आणि महामंडळ यांच्यातील वाद विकोपाला गेला आहे या वादात प्रवाशी मात्र भरडले जात आहेत म्हणूनच सरकारने एसटीच्या खाजगिकरणाचा अट्टाहास सोडून एसटीला सशक्त करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. कंत्राटी ऐवजी कायमस्वरूपी कर्मचारी नेमून त्यांना इतर शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन आणि सुविधा दिल्यास महामंडळाला पुन्हा सुगीचे दिवस येतील. प्रवाशांच्या मनात एसटी विषयी आपुलकीची आणि आदराची भावना आहे. सरकारनेही एसटी कडे आपुलकीने पाहिल्यास एसटीला पुन्हा गतवैभव प्राप्त होईल. राज्यातील प्रवाशांच्या मनात मानाचे स्थान असलेल्या आणि सर्वांच्या लाडक्या लालपरीला म्हणजेच एसटीला ७७ व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# दुसऱ्यांना नावे ठेवण्यापेक्षा स्वत: चांगले वागा...

आजकाल स्वतःच्या चुका तशाच ठेवून दुसऱ्यांना नावे ठेवणारी माणसे या पृथ्वीतलावर खूप वाढली आहेत. ही माणसे सार्वजनिक ठिकाणी चार माणसात गेल्यावर आपल्या ओंगळ वर्तनाचे प्रदर्शन करतात. म्हणजे स्वतः कसेही वागतात, कसेही बोलतात, कसेही राहतात, जणू यांच्यात कोणतेच माणुसकीचे गुणधर्म नाहीत. यांचे वर्तन म्हणजे निव्वळ रानटी पशु प्रमाणेच असते. पण ही माणसे दुसऱ्यांना नावे ठेवण्यात फार पटाईत असतात.स्वतःच्या गुणदोषांकडे दुर्लक्ष करून इतरांच्या चुका शोधत बसतात.स्वतः तील चुका दुरुस्त करायच्या सोडून दुसऱ्यांना नावे ठेवण्यात काय अर्थ? स्वतः कसेही मोकाट वागून मानवतेला अशोभनीय वर्तन करायचे, सैतानी दुष्कृत्य करायचे आणि दुसऱ्यांना चांगले रहा म्हणून सांगायचे, हे कसे चालणार? स्वतः माणुसकी हिन जीवन जगायचे, आणि दुसऱ्याला मानवतेचे धडे शिकवायचे, हे कितपत योग्य आहे?

या बाबींचा विचार करून प्रत्येकाने स्वतः चे आत्मपरीक्षण करायला हवे.असे मला वाटते. कारण हल्ली मानवतेचा वस्तूपाठ शिकवणारी म ाणसे जागोजागी पाहायला मिळत आहेत. या म ाणसांचा सुळसुळाट आता कमी न होता वाढतच आहे.बसने प्रवास करताना, समाजात व गावात वावरताना आणि शहरी भागात सैर करताना अशा नावे ठेवू लोकांचे दर्शन आपोआप घडते. ही म ाणसे दुसऱ्यांना कसे नावे ठेवतात? दुसऱ्यांबद्दल कसे बोलतात? हे बघायला व ऐकायला मिळते. या माणसांना वाटते की, आपण खूप पवित्र आहोत. बावनकशी सोन्यासारखे शुद्ध आहोत. आपल्यात कोणतेच गुणदोष नाहीत. म्हणून ते स्वतःचे आत्मपरीक्षण न करता दुसऱ्यांना खुशाल नावे ठेवतात. स्वतःच्या घरातील अंधार निस्तरायचा सोडून दुसऱ्यांच्या घराला नाहक नावे ठेवण्याचे काम करतात. त्यांना स्वतःच्या डोळ्यातील मुसळ दिसत नाही पण लोकांच्या डोळ्यातील कुसळ मात्र नक्की दिसते. मी सम ाजात व गावात वावरत असताना काही माणसे असेही बघतोय की, जी माणसे घरातील वृद्ध आई-वडिलांना कधीच प्रेमाने बोलत नाहीत, त्यांना जीव लावत नाहीत, त्यांच्या भावनांची कदर करत नाहीत. त्यांना पत्नीचे ऐकूण रोज टोमणे देतात, तीच माणसे बाहेर जाऊन लोकांना आई-वडिलांचे महत्त्व सांगतात.आई-वडिलांची काळजी घ्या, त्यांच्यासोबत नीट वागा, त्यांना जीव लावा, त्यांना वेळेवर जेवण द्या, असे लोकांना सांगतात. पण स्वतः कसे वागत आहोत, याकडे मात्र दुर्लक्ष करतात. मग असला शहाणपणा काय कामाचा? स्वतः आई-वडिलांना कसलेही घाण घाण बोलायचे आणि समाजाला आई-वडिलांचे महत्त्व सांगायचे, याला काय अर्थ हो? समाजाला सर्व माहित असते की, कोण आई-वडिलांची काळजी घेतोय आणि कोण घेत नाही. तसेच सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात सुद्धा अशी लोक पाहायला मिळतात. सामाजिक क्षेत्रात काम करणारे व स्वतःला समाजसेवक म्हणून घेणारे आणि ज्यांचे सामाजिक कार्य शून्य असणारे काही महाभाग, जो सामाजिक क्षेत्रात स्वतःला झोकून देऊन प्रामाणिकपणे काम करतो, ज्याचे सामाजिक क्षेत्रात मोलाचे योगदान आहे, अशा कर्तृत्वान व कार्यतत्पर माणसाला हे महाभाग नावे ठेवतात. आणि स्वतः किती कर्तृत्ववान आहोत हे लोकांना दाखवून देतात. शैक्षणिक क्षेत्राचा विचार केला तर प्रत्येक शाळेत टंगळमंगळ करणारे, कामचुकार, व्यसनी व मनमानी शिक्षक असतात. ते विद्यार्थ्यांना अध्यापन तर नीट करतच नाहीत. वर्गात वेळेवर येत नाहीत. आणि विद्यार्थ्यांना कसेही शिकवून मोकळे होतात.असे कामचुकार शिक्षक प्रामाणिकपणे काम करणाऱ्या, तळमळीने व जीव ओतून शिकवणाऱ्या कर्तृत्वान व आदर्श शिक्षकांना बिंधास्त नावे ठेवतात. त्यांना नाहक बदनाम करून त्यांची मानहानी करतात.हे मी विद्यार्थी दशेत असताना शाळेत व महाविद्यालयात अनुभवले आहे. आणि हेच शिक्षक दुसऱ्या कर्तव्यदक्ष सहकारी शिक्षकांना कर्तव्यपरायणता शिकवण्यात फार पटाईत असतात. विद्यार्थ्यांचे पालक भेटल्यावर त्यांना सांगतात की, मी विद्यार्थ्यांना जीव ओतून व जादा तासिका घेऊन शिकवण्याचे काम करतोय.शाळेसाठी माझे योगदान खूप मोठे आहे. मी विद्यार्थी प्रिय शिक्षक आहे. माझे शैक्षणिक व सामाजिक कार्य वाखाणण्याजोगे आहे. असे काहीपण खोटे बोलून पालकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतात. तसेच आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी माझा पाठपुरावा करा म्हणून पालकांना तगादा लावतात. पुरस्कारासाठी राजकीय लोकांचे व विविध सामाजिक संघटकांचे पाय धरतात. पुरस्कार मिळावा म्हणून खूप धडपड करतात. आणि एकदाचा पुरस्कार मिळवतात. आणि तो पुरस्कार हातात घेतलेला फोटो विविध वर्तमानपत्रात आणि सोशल मीडियावर प्रसारित करतात. पण पालक आणि विद्यार्थी काय वेडे नसतात, त्यांना चांगले माहित असते की, कोणता शिक्षक चांगले अध्यापन करतोय आणि कोणता नाही. तेव्हा अशा लोकांना सांगावे वाटते की, बांधवांनो समाज काय वेडा नसतो, तुमचा ढोंगीपणा ऐकून तुम्हाला डोक्यावर घ्यायला. आणि तुमच्या टिचभर कार्याची ढीगभर प्रशंसा करायला.समाजाला सर्व माहित असते की, कोण आई-वडिलांची काळजी घेतोय आणि कोण नाही घेत. कोणता शिक्षक प्रामाणिकपणे ज्ञानदान करतोय आणि कोणता कामचुकारपणा करतोय. हे आपण लोकांना सांगत बसायची काहीच गरज नाही. गावकरी बरोबर ओळखून घेतात. आणि चांगल्या माणसाला चांगलंच म्हणतात आणि वाईटाला वाईटच म्हणतात. अगोदर आपल्या वर्तनात योग्य असा बदल करून माणसासारखे नीट वागायला शिका, लोकांच्या घरावर बोट दाखवण्यापेक्षा अगोदर आपले घर तपासून पहा... दुसऱ्यांच्या आया बहिणींना नावे ठेवण्यापेक्षा आपल्या घरातील सदस्याला चांगले वागायला सांगा...म्हणजे स्वतः चांगले वागा आणि मग लोकांच्या चुका लोकांना दाखवून द्या. तेव्हा समाजही तुमच्या शब्दाला मान ठेवून तुम्हाला सलाम करेल...



**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# बदलत्या हवामानामुळे वेळेच्या आधी पाऊसाचे थैमान!

बदलत्या हवामानामुळे पाऊसाने सुध्दा आपली दीनचर्या बदलल्याचे दिसून येते.वेळेच्या आधी पाऊसाने राज्याच्या अनेक भागांत आक्राळ-विक्राळ रूप धारण केल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रम ाणात नुकसान,विज कोसळुन मृत्यूची संख्या,पशुधनाचे नुकसान झाले,पुरपरिस्थिती अशा गंभीर दुर्घटना व समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे.मे महिन्यातच राज्याच्या अनेक भागात रेड अलर्ट तर काही भागात ऑरेंज अलर्ट जाहीर केला आहे म्हणजेच पुढे चालून अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. त्याचप्रमाणे बदलत्या हवामानामुळे आणि ग्लोबल वॉर्मिंगमुळे देशात अती पाऊस,अती उष्णता,अती थंडी, सुनामी हा प्रकार दिवसेंदिवस वाढतच आहे.म्हणजे भारतात उन्हाळा,पाऊसाळा आणि हिवाळा असे तीन ऋतू आपले नियमित कार्य करायचे. परंतु बदलत्या हवाम ानामुळे संपूर्ण ऋतूंनी आपली दिनचर्या बदलल्याचे स्पष्ट दिसून येते. त्यामुळेच आतापासूनच राज्यासह देशात पाऊसाने विक्राळ रूप धारण केले आहे.यंदा हवामानाच्या अंदाजानुसार (जून ते सप्टेंबर) या कालावधीत सरासरीपेक्षा अधिक म्हणजे देशभरात १०६ टक्के पाऊस कोसळणार असल्याचे सांगितले जाते.यंदाचा महाराष्ट्रातील वरूणराजाचा अंदाज जाहीर झाला असून कोकण-गोवा १०७ टक्के पाऊस, मध्य महाराष्ट्र ११० टक्के पाऊस, मराठवाडा ११२ टक्के पाऊस, विदर्भ १०९ टक्के पाऊस या पेक्षा अधिक पाऊस पडण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. म्हणजेच पावसाचा काळ अत्यंत गंभीर आहे.परंतु सध्या वेळेच्या आधीच अती पाऊस आल्याने महाराष्ट्रासह देशातील अनेक भागांत मोठी तारांबळ उडाल्याचे दिसून आले.परंतु सध्या महाराष्ट्रात पाऊसाचा जोर कायम असून विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, मुंबई, रायगड इत्यादी भागात मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळित झाले असून अनेक भागांत तारांबळ उडाल्याचे दिसून आले व अनेक भागात पुरपरिस्थिती निर्माण झाल्याचे दिसून आले.सध्याच्या परिस्थितीत विदर्भ अलर्ट मोडवर असुन म राठवाड्यातील अनेक भागांत पुरपरिस्थिती आहे.देशात आतापर्यंत आलेल्या पावसाच्या तुलनेत २५ वर्षांच्या काळातील ही सातवी वेळ आहे.यावर्षी पाऊसाचा सांगितलेला अंदाज हा २०१३ प्रमाणेच असल्याचे सांगितले जाते म्हणजेच यावर्षी पाऊस उग्र रूप धारण करू शकतो.सरकारने लक्षात ठेवले पाहिजे की पुर्वीची परिस्थिती आणि आताच्या परिस्थितीमध्ये जमीन-आसमानचा फरक आहे.पुर्वी पाणी जमिनीत मुरायचे त्यामुळे पुरपरिस्थिती लवकर निवळायची.परंतु वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण, जंगलतोड ,अत्याधुनिकरण व मोठ्या प्रमाणात सिमेंटरोडचे जाळे यामुळे राज्यासह देशातील अनेक भागांत जमिनीत पाणी मुरत नसल्याने राज्यासह देशातील अनेक भागांत आपल्याला थोड्याशा पावसातच पुरपरिस्थिती दिसून येते. त्यामुळे राज्यासह देशात येणाऱ्या पावसाचा अंदाज पहाता राज्य प्रशासनाने व केंद्र प्रशासनाने सतर्क राहाने गरजेचे आहे. सध्या सुरू असलेल्या अती पावसामुळे राज्यात आतापर्यंत ४ दिवसांत २१ लोकांचा मृत्यू झाला असून १२ पेक्षा अधिक गंभीर जखमी झाल्याचे सांगितले जाते ही अत्यंत गंभीर बाब आहे. सध्या बरसलेल्या धो-धो पावसावरून हवामान खात्याच्या शास्त्रज्ञांतच झालेला पाऊस मोसमी की वळिवाचा (अवकाळी) याबाबत एकमत होत नाही. कारण मे महिन्यातील पाऊस हा वाजवीपेक्षा अधिक झाल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे.सुरू असलेला पाऊसाचे थैमान व येणाऱ्या पावसाचा अंदाज पहाता स्थानिक प्रशासन, राज्य प्रशासन व केंद्र सरकारने आतापासूनच सतर्क राहाने अत्यंत गरजेचे आहे.कारण वाढत्या शहरीकरणामुळे ड्रेनेज सिस्टीम सुधारणे गरजेचे आहे.कारण सध्याच्या परिस्थितीत एखाद्या पावसामध्येच पुरपरिस्थिती निर्माण झाल्याचे आपण उघड्या डोळ्यांनी पाहीले आहे.त्यामुळे येणाऱ्या पावसापासून होणारे नुकसान टाळण्यासाठी सरकारने आतापासूनच युध्दपातळीवर कार्य करने अत्यंत गरजेचे आहे.त्याचप्रमाणे बदलत्या हवामानामुळे अती पावसाची शक्यता पाहता शेतकरी, शेतमजूर, नदी काठावरील रहाणारे नागरिक, तलावाच्या काठावर रहाणारे नागरिक, वाहन चालक यांनी येणाऱ्या पावसापासून व विजेपासून सावधगिरी बाळगावी.

**रमेश कृष्णराव लांजेवार, मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## मानव रूपातील हैवान...

देशात वाढलेला अत्याचार पाहून
सभ्य माणसाला दुःख होत आहे...
दिवसाढवळ्या झालेले बलात्कार
माणसातील हैवान दाखवत आहे...
माणसाला वासनेपुढे चिमुरडी
कळत नाही की वयोवृद्ध म्हातारी...
यांना वासनेची शिकार बनवून
तो करत आहे आपली हवस पुरी...
माणूस अमानुषतेचा कळस गाठतोय
आपल्याच माणसाला ठार मारतोय...
जन्मदात्या आईवडिलांना लाथाडून
वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवतोय....
माणूस उजेडात चारित्र्यवान असल्याचे
ढोंग करून लोकांची मने जिंकतोय...
दिवसा दोनचार सत्कर्माचा दाखला देऊन
संध्याकाळी मात्र खुशाल कुकर्म करतोय....
कपाळाला भस्म लावलेले बुवाबाबा
अंगावर भगवे वस्त्र परिधान करतात...
भोळ्याभाबड्या महिलांना फसवून
त्यांचे लैंगिक शोषण करतात....
आता मानव रूपातील हैवानांना
ओळखणे काळाची गरज आहे...
दुष्कर्म करणाऱ्या हैवानांना शिक्षा देऊन
माणसात आणणे शासन कर्तव्य आहे...
माणसांनो माणूस बना नका बनू हैवान
माणुसकी ओशाळत आहे याचे ठेवा भान..
नका हो जाऊ देऊ माणुसकी लयास...
माणुसकी संपुष्टात आली तर जगाचा होईल विनाश

**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**मो. ७४९८७१५६६१**

# कृषिमंत्र्यांचे बेताल वक्तव्य; अजित दादा... कोकाटेंना आवरा...!

निवडणुका येतात जातात. त्यानंतर सरकार स्थापन होते. त्यातच महाआघाडी महायुती करण्या करता काही महिने निघून जातात. निवडणुकीपूर्वी सर्वच पक्षांकडून वेगवेगळे आमिषे दाखवले जातात. आश्वासन दिली जातात. शेतकऱ्याला कर्जमाफी, पीक विमा, व्याज सवलत असे,तसेच शेतीच्या प्रगतीसाठी अनेक योजना जाहीर होतात. पण नंतर पुढे येणाऱ्या काळात सत्तेचे समीकरण बनवता बनवता या गोष्टीचा सोईस्कर पणे विसर पडतो. तसेच काहीसे आता झालेले आहे. सत्येवर पक्ष कोणताही असो परंतु दिलेल्या आश्वासनाची पूर्तता आणि कबुली ही द्यायलाच हवी नाहीतर केवळ ती फसवणूक झाली समजावे. अवर्षणग्रस्त आणि अतिवृष्टीने बाधित विभागाला पिक विमा चा भक्कम आधार देणे आवश्यक आहे. आताची परिस्थिती बघितली तर जिकडे तिकडे कर्जमाफी आणि पीक विम्यासाठी शेतकऱ्यांम ध्ये असंतोष आहे. केवळ निवडणुका डोळ्यासमोर ठेवून हे सर्व केले जाते. आश्वासन देवूनही त्यानंतर आता बघा शेतकऱ्याला कर्जमाफी पीक विमा अनुदान यासाठी आंदोलन करावे लागत आहेत. अजूनही कर्जाच्या बोजामुळे खचून जाऊन शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतच आहेत.

प्रहार संघटनेचे आमदार बच्चू कडू आक्रमक झाले आहेत. निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी जाहीर केली असून अद्याप त्याविषयी काहीही हालचाल नाही किंवा वक्तव्य नाही म्हणून कर्जमाफी मिळेपर्यंत त्यांनी आंदोलन करत आहेत. उद्योगपतींना काही लाख कोटींची कर्जमाफी होते पण शेतकऱ्याकडे आता दुर्लक्ष आहे म्हणून त्यांनी हे सरकारचा निषेध व्यक्त केला आहे.

शेतकरी ब्रिगेडचे,शेतकरी नेते प्रकाश पोहरे यांनीही कर्ज मुक्तीसाठी लढा उभारलेला आहे आणि शेतकऱ्यांकडून त्यासाठी अर्ज भरून घेत आहेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी कर्जमाफीचे आश्वासन जाहीरनाम्यातच दिले होते परंतु सरकारने अत्यांपर्यंत त्याविषयी काही विचार केला नाही अजित पवार तर म्हणाले आहेत आता कर्जमाफी देणे शक्यच नाही, आणि कर्जमाफी विषयी मी काही बोललो नाही.जे कोणी बोलले असतील त्यांना विचारा.

२५ वर्षांतील सर्वात मोठा पाऊस असल्याची नोंद घेण्यात आली आहे. विदर्भ,मराठवाडा, जालना,नासिक, खानदेशातील अनेक जिल्ह्यात सर्वाधिक पाऊस झाल्याची नोंद आहे. या पावसाम ुळे शेतीमालाचे मोठे नुकसान झाले आहे. तातडीने पंचनामे करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शेतकऱ्यांना सरकारकडून नुकसानभरपाई मिळेल, असा विश्वास वाटत आहे.

कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांविषयी अनेक वादग्रस्त आणि शेतकऱ्यांचा अवमान करणारी विधाने



केलेली आहे.

कृषिमंत्री कोकाटे यांनी केलेल्या वादग्रस्त विधानामुळे नवा वाद उफाळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. कोकाटे यांनी कर्जमाफीची रक्कम साखरपुडा,लग्नासाठी खर्च केली जाते, त्यातील एक रुपया तरी शेतीला लावता का ?असे वक्तव्य केले होते. आता भिकारी ही एक रुपया घेत नाही आम्ही एक रुपयात पिक विमा घेतो असेही वक्तव्य केले होते. आता भिकारी आणि शेतकरी हे वक्तव्य काय आहे काहीतरी असंबद्ध प्रकारचे वक्तव्य आहे.अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची कृषी मंत्री कोकाटे यांनी पाहणी केली. त्यानंतर पत्रकारांशी बोलत असतानाच त्यांनी हे वक्तव्य केले. मंत्री कोकाटे म्हणाले की, नुकसानीचे पंचनामे सुरू असल्याचे सांगितले. तर शेतकऱ्यांचे असे म्हणणे आहे की, उभ्या पिकांचे पंचनामे केले जात आहेत, असे विचारले असता मंत्री कोकाटे म्हणाले की, कापणी झालेल्या पिकांचे पंचनामे करून काय होणार? ढेकळांचे पंचनामे करायचे का? जे नियम ात बसेल त्याप्रमाणे करा पण किमान शेतकऱ्यांना डिवचवू नका आणि अपमान कारक बोलू नका. सवेदनशीलता असू द्या. शेतकऱ्यांशी बोलत असतानाही ते अतिशय त्रासिक पणे बोलत होते आणि हे त्यांचे चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होते. या आध सुध्दा एका राजकीय नेत्याने कितीही दिले तरी रडतात साले असे शेतकऱ्यांनचा अवमान करणारे वक्तव्य केले होते. कोणी आपल्या खिशातून काढून देत नाही.

महाराष्ट्रातील ७० टक्के शेतकरी कोरडावू शेती करणार आहे. त्याचे उत्पन्न तरी किती असते,? आणि त्याला भाव काय मिळतो ? उत्पन्न किती होते ? याचा काही विचार बोलताना करायला हवा. सर्वेक्षणानुसार महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे उत्पन्न दरमहा दहा ते अकरा हजार रुपयांच्या दरम्यान आहे.वर्षभरात जे काही थोडेफार उत्पन्न मिळते त्यातूनच त्याला संसाराचा खर्च, मुला मुलींचे शिक्षण, लग्न, आजारपण,सामाजिक कार्य, हे सर्वच करावे लागते आणि त्यासाठी त्याला काही वेगळा पैसा नसतो त्यामुळे आलेल्या पैशाचा नसतो हे सर्व करत असतो मग तो पैसा नुकसान भरपाईचा असो अनुदान असो व कर्जमाफी असो त्याचा कसा वेगळा हिशोब ठेवत नाही. त्याला काही भत्ते मिळत नाही की रगड पगार मिळत नसतो.प्रवास फुकटचा नाही. तेव्हा बोलणाऱ्यांनी मात्र याचा विचार करायला हवा आणि मगच बोलावे मग ते कोणीही असो. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या या विधानाबाबत जनम ानसात शेतकरी वर्गात अतिशय चीड निर्माण झाली आहे. आणि संताप व्यक्त केला जात आहे. त्यांनी माफी मागवावी असा सवालही उपस्थित केला गेला आहे. कृषी मंत्री किती संवेदनशील असावे. इथे तर शेतकऱ्याच्या जखमेवर मीठ चोळले जात आहे आता कोकाटे यांनी वादग्रस्त वक्तव्य केले आहे. या वक्तव्यावर शेतकरी संघटनांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत.

शेतकऱ्यांची अवहेलना करू नका. शेतकऱ्यांना मदत करता आली नाही तरी चालेल मात्र वारंवार बळीराजाचा अपमान होता कामा नये. केवळ सत्तेच्या मुजोरीतून हा अपमान केला जात आहे. पुन्हा बळीराजाला असे काही बोललल्यास रांगड्या भाषेत उत्तर दिले जाईल.

मुख्यमंत्री, यांनी कर्जमाफी आणि नुकसान भरपाई झालेल्यांना पिक विमा रक्कम तसेच नियमित कर्ज फेड करणाऱ्यांना अनुदान देण्याविषयी काय धोरण आहे याविषयी पूर्तता करावी म्हणजे.गत वर्षी झालेल्या अतिवृष्टीचे विमा नुकसान भरपाईचे पैसे अध्यक्ष शेतकऱ्यांना मि ळालेले नाहीत. शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष कमी होईल. निवडणूक आधी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता होणे महत्त्वाचे आहे तसेच शेतकऱ्यांविषयी बेताल वक्तव्य करणारांना त्यांनी मंत्रिमंडळ बैठकीत सूचना देणे आवश्यक आहे.मा. देवेंद्र फडणवीस साहेब ती करतील ही अपेक्षा आहे.



बळीराजा वाचला तर शेती फुलेल.
बळीराजाने नाही केला पेरा तर काय खाल धतुरा...

**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जिल्हा जळगाव.**
**मोबा.नं- ८९ ९९ ५६ ६९ १७**




**राष्ट्रवादी काँग्रेस भवन जुना जालना येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार जालना शहराच्या वतीने राजमाता, राष्ट्रमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी शहराध्यक्ष नंदकिशोर जागंडे, उपाध्यक्ष तय्यबबापु देशमुख, जयंत भोसले, अंबादास शिंदे, कैलास मगरे, आमेर सिद्दीकी, अशोक, बाळु कुंटे, मुक्ताराम शिंगाळे, शंकर बोंद्रे, अर्जुन भोंगळे व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**

# सिद्धार्थ महाविद्यालयात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जयंती साजरी

**जाफराबाद । प्रतिनिधी -** येथील सिद्धार्थ कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची ३००वी जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रमेश देशमुख होते तर उपप्राचार्य प्रो.डॉ.सुनील मेढे यांची प्रमुख उपस्थिती होती.तर प्रमुख वक्ते म्हणून श्री.कृष्णा दिवटे यांनी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनावर सविस्तर माहिती दिली. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. देशमुख यांनी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनातील अनेक पैलू उपस्थितांना उलगडून सांगितले.

अहिल्याबाई चे माहेर हे महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील चौंडी हे असून लग्नानंतर त्या मध्यप्रदेशातील होळकर घराण्याच्या सून झाल्यानंतर त्यांच्यावर राजघराण्याची गादी सांभाळण्याची जबाबदारी आल्यावर त्यांनी अनेक समाज हिताचे निर्णय घेतले. नदी घाट बांधले,बारा जोतिर्लिंगाचा




जीर्णोद्धार केला,तत्कालीन समाजातील जुन्या व कर्मठ रूढी परंपरा बंद करून एक आदर्श राजमाता होण्याचे कार्य पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी केल्याचे प्राचार्य डॉ देशमुख यांनी आपल्या भाषणात सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभारप्रदर्शन प्रा. सिद्धार्थ पैठणे यांनी केले.यावेळी महाविद्यालयातील कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

---

जिल्हा महिला व बाल रुग्णालय, जिल्हा सामान्य रुग्णालय आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात

# हिमालया बेबी केअरच्यावतीने बेबी फिडिंग पॉडचे उदघाटन

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील जिल्हा महिला व बाल रुग्णालय, जिल्हा सामान्य रुग्णालय आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे हिमालया बेबी केअर च्या वतीने सीएसआर च्या माध्यमातून बेबी फिडिंग पॉडचे उद्घाटन मेडीकल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. सुधिर चौधरी आणि जिल्हा महिला व बाल रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. एस. झेड. गवारे यांच्या हस्ते करण्यात आले. शुक्रवार दि. ३० मे २०२५ रोजी दुपारी १ वाजता हा उद्घाटन सोहळा पार पडला.




या बेबी फिडिंग पॉडसाठी सीएसआर राज्य समन्वयक विजय गायकवाड यांच्या पुढाकाराने जालना येथे ३ पॉड मंजूर करण्यात आले आहेत. या कार्यक्रमासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय जालना तर्फे अधिष्ठाता डॉ. सुधीर चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली समाजसेवा अधीक्षक महेंद्र साळवे आणि ठाकूर शाह यांनी जिल्हा सामान्य रुग्णालय जालना येथील समाजसेवा अधिक्षक सुनील जोनवाल, श्रीमती विशाखा माने यांनी सहकार्य केलं.

या उद्घाटन कार्यक्रमात सूत्रसंचालन समाजसेवा अधीक्षक ठाकूर शाह यांनी केले, वैद्यकीय अधिक्षक डॉ. गवारे यांनी या फिडिंग पॉड साठी आभार व्यक्त केले. तसेच अधिष्ठाता डॉ. सुधीर चौधरी यांनी समाजसेवा अधीक्षक यांच्या कामाचा गौरव करत या नावीन्यपूर्ण उपक्रमाचा लाभ सर्व महिला, स्तनदा माता यांनी घ्यावा असे आवाहन केले. या कार्यक्रमासाठी इनचार्ज श्रीमती गडकरी, साळुंके, पवार, भाले, वृषाली कुलकर्णी यांच्यासह रुग्णालय कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमात काही स्तनदा माता यांना हिमालया बेबी केअर सेंटर तर्फे काही भेट वस्तू देण्यात आल्या.

# जाफराबादच्या नगराध्यक्षा सुरेखा लहाने यांच्यावरील कारवाईला उच्च न्यायालयात स्थगिती

**दत्ता देशमुख**

**जाफराबाद -** येथील नगराध्यक्ष डॉ सुरेखा लहाने यांच्यावर मंत्रालयातून करण्यात आलेल्या अपात्रतेच्या कारवाईला उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजी नगर खंडपीठाने स्थगिती दिली असून ३० मे रोजी होऊ घातलेली नगराध्यक्ष निवडीची प्रक्रिया सुद्धा स्थगित होण्याचे संकेत आहेत. कारवाई झाल्यानंतर रिक्त झालेल्या नगराध्यक्ष पदासाठी येणाऱ्या ३० तारखेला विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. २९ एप्रिल रोजी नगर विकास विभागाने सुरेखा लहाने यांना नगराध्यक्ष व नगरसेवक पदावरून अपात्र ठरविले होते. दरम्यान या अपात्रतेच्या कारवाईला डॉ. सुरेखा लहाने यांनी उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजी नगर खंडपीठात आव्हान दिले होते. मंगळवारी तारीख २७ न्यायालयाने स्थगिती आदेश दिला. नगराध्यक्षाची होणारी निवड ही न्यायप्रविष्ठ असणार आहे यासंदर्भात पार्श्वभूमीने रविवारच्या अंकात वृत्त प्रसिद्ध केले होते.



जिल्हाधिकाऱ्यांनी जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार नगराध्यक्ष पदासाठी २१ मे पर्यंत माजी नगराध्यक्ष तथा अपक्ष नगरसेविका कविता दीपक वाकडे, काँग्रेसच्या शशिकला विजयकुमार हिवाळे, अपक्ष मिराबाई शंकरलाल जैस्वाल, फरीदा बेगम पठाण यांचे उमेदवारी अर्ज प्राप्त झालेले होते.

**न्याय देवतेने न्याय दिला**

आपल्यावर करण्यात आलेली कारवाई ही राजकीय द्वेषापोटी करण्यात आलेली होती. जाफराबाद शहरासाठी आपण सातत्याने पाठपुरावा करून ५० कोटी रुपये खर्चाची पाणीपुरवठा योजना मंजूर करून आणली आहे. याशिवाय जाफराबाद शहरात मोठ्या प्रमाणात घरकुलांची कामे सुद्धा मंजूर झालेली आहे आपल्यावर करण्यात आलेल्या कारवाईला आपण उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. अपात्रतेच्या कारवाईला स्थगिती मिळाल्याने आपल्याला न्यायदेवतेकडून न्याय मिळाला आहे अशी प्रतिक्रिया डॉ सुरेखा लहाने यांनी व्यक्त केली.

---

## पान १ वरुन

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी ...

निधी लागणार होता, तो देण्याचे काम शासनाने केले आहे.

आज आपण लेक लाडकी म्हणतो तसे सूनही लाडकी मानली पाहिजे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना कधीही बंद केली जाणार नाही, असेही उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले.

प्रास्ताविकात प्रा. राम शिंदे म्हणाले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती शासनाच्यावतीने २०१७ पासून साजरी करण्यात येत आहे. श्रीक्षेत्र चौंडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मृतीस्थळासाठी शासनाने ६८१ कोटी रुपये मंजूर करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. मागणी केल्यानंतर अवघ्या १६ महिन्यांच्या कालावधीतच जिल्ह्याचे नाव अहिल्यानगर करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आली.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, आज देशभरात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी केली जात आहे. जिल्ह्यातील एक लाख एकल महिलांच्या पुनर्वसनासाठी जिल्ह्यात प्रकल्प राबविण्यात येणार आहे. श्रीक्षेत्र चौंडी विकासासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे ते म्हणाले.

क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, अहिल्यादेवी होळकरांच्या आदर्श समोर ठेवीत शासनाने लोकहिताचे अनेक चांगले निर्णय घेतले आहेत. धनगर समाजातील नागरिक, विद्यार्थ्यांना सवलती मिळाव्यात यासाठी राज्य शासनाने अनेक योजना सुरू केल्या आहेत. अहिल्यादेवी होळकरांचा वारसा जपण्यासाठी श्रीक्षेत्र चौंडीच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून दिला आहे. आमदार गोपीचंद पडळकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती सोहळ्याच्या निमित्ताने लोकराज्यचा विशेषांकाचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर आधारित इतर विशेषांक आणि पुस्तकाचे प्रकाशनही यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमाला आमदार गोपीचंद पडळकर, मोनिकाताई राजळे, शिवाजीराव कर्डीले, सुरेश धस, आमदार विठ्ठलराव लंघे, काशिनाथ दाते, आमदार अमोल खताळ, माजी मंत्री अण्णा डांगे, बबनराव पाचपुते, स्नेहलता कोल्हे, रमेश शेंडगे, प्रा. लक्ष्मण हाके, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी आदी उपस्थित होते.

### देळेगव्हाण येथील ...

पाऊस होऊन दोन्ही नालीद्वारे येणारे सर्व पाणी शेतात शिरले. याबाबत कापसे यांनी तहसीलदारांकडे दहा-पंधरा दिवसांपूर्वी तक्रारही केली होती. परंतु, तहसीलदार सारिका भगत यांनी कुठलीही दखल न घेतल्याने कापसे यांनी अखेर बुधवारी सकाळी ९ वाजता पावसाच्या साचलेल्या पाण्यात बसून आंदोलन करण्याचा निर्णय घेतला. घटनेची माहिती मिळताच टेंभुर्णी पोलिस ठाण्याचे एपीआय सचिन खामगळ व पोलिस कर्मचारी,ज्ञानेश्वर ठाकरे, प्रदीप धोंडगे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहायक अभियंता एस एस शेख,एस डी छडीदार,एस एम सवडे, तलाठी उषा म्हस्के यांनी घटनास्थळी येऊन पाहणी केली. यावेळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### भव्य संत ...

ह. भ. प. पंढरीनाथ तावरे नाना, ह. भ .प. संजय महाराज पाचपोर, ह .भ .प .भगीरथ बाबा( पांडुरंग आश्रम गेवराई, बीड)आदी संत मंडळी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये या कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे. सप्ताहामध्ये लोप पावत चाललेली ज्ञानेश्वरी प्रवचन परंपरा व हरीपाठाचे बदलत चाललेले स्वरूप ,त्यासोबतच संप्रदाय शुद्ध कीर्तनपरंपरेला आलेले दांभिक स्वरूप यासह अनेक विषयांवर या संत संमेलनामध्ये चर्चा होणार असून ज्येष्ठ महाराजांकडून या संदर्भामध्ये सर्व युवक महाराजांना मार्गदर्शन करण्यात येणार आहेत.संपूर्ण महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणावर संत मंडळी या निमित्ताने श्रीक्षेत्र मुक्त धाम आश्रम या ठिकाणी येणार आहेत. या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री प्रतापरावजी जाधव, खा. कल्याणजी काळे,माजी मंत्री आ .अर्जुन खोतकर,माजी मंत्री डॉ.राजेंद्रजी शिंगणे, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, माजी मंत्री राजेश टोपे, आ .विक्रम काळे आ.मनोज कायांदे, आ. संजय गायकवाड, आ. श्वेताताई महाले, आ. सिद्धार्थ खरात,आ.योगेश टिळेकर, यांच्यासह जालना आणि बुलढाणा जिल्ह्यातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, अध्यात्मिक या क्षेत्रामध्ये कार्य करणारे आणि परिसरातील नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहणार आहेत. या निमित्ताने वृक्षरोपण, सोहमयोगी या ग्रंथाचे विमोचन, बालसंस्कार शिबिराची सांगता, संगीत चक्रीभजन, त्याचप्रमाणे ह.भ. प. गुरुवर्य यशोधन महाराज साखरे यांचे हरिकीर्तन असा भरगच्च कार्यक्रम या निमित्ताने आयोजित केलेला आहे.

समस्त भक्तगण श्रीक्षेत्र मुक्त धाम आश्रम सावरगाव माळ तालुका सिंदखेड राजा जिल्हा बुलढाणा यांच्या वतीने या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

### अहिल्याबाईंचे कार्य ...

स्वयंसेवी संस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमात आरोग्यविषयक जनजागृती, एकात्मता, राष्ट्रप्रेम आणि महिला सक्षमीकरणाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. जालन्यात भरलेल्या या उत्साही, अनुशासित आणि सामाजिक संदेश देणाऱ्या उपक्रमामुळे अहिल्यादेवी होळकर यांच्या विचारांची आणि कार्याची आधुनिक काळातील पुनःप्रस्थापना झाली, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

### मनपातील ...

सामाजिक संघटनेची बैठक आयोजित करण्यात आली होती या बैठकीला हा ठराव घेण्यात आला असल्याची माहिती सकल विभाग सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शंकर शिरगुळे, जिल्हाध्यक्ष राहुल मुळे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी दिव्यांग सेल जिल्हाध्यक्ष सतीश फतपुरे, शिवसेना दिव्यांग आघाडी जिल्हाध्यक्ष लक्ष्मी भुतडा, सतीश वाघ, नागराज आंबिलवादे, जगदीश सातपुते, सुनिता लोळगे, सुरेश बोर्डे, महेश लहाने, शेख शेफीग मिया, सविता बोराडे आदींनी दिली आहे

जालना महानगरपालिकेच्या दिव्यांग विभागाचे अधीक्षक रामेश्वर घोळवे यांची बदली रद्द करा या मागणीसाठी दोन जून सोमवार रोजी सकल दिव्यांग सामाजिक संघटनेच्या वतीने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मस्त गड गांधी चमन महानगरपालिकेवर निघणाऱ्या मोर्चाला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी युती आघाडीचा पाठिंबा असल्याचे राष्ट्रवादी युवती आघाडीचे जिल्हाध्यक्ष शितल बारोटे, पल्लवी महाले, गीतांजली ढवळे यांनी म्हटले आहे.

# राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती निमित्त भव्य रक्तदान शिबीर संपन्न

**मंठा । प्रतिनिधी -** पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त श्रीमंत सुभेदार मल्हारराव होळकर प्रतिष्ठान मंठा यांच्यावतीने ( ता.३१) शनिवार रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ५८ रक्तदात्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत रक्तदान केले.

यावेळी मंठा व्यापारी संघटनेचे अध्यक्ष बाळासाहेब नाना बोराडे, जनकल्याण ब्लड बँक जालना चे शिवराज दादा जाधव,कृष्णा शेरे, दत्तरावं हातकडके,संजय बोराडे,प्रा.डॉ. माणिकराव थीटे सर, राजेश शिंदे सर,आंबादास हातकडके ,भगवान गायकवाड,गणेश गायकवाड,शिवाजी हातकडके यांची प्रमुख उपस्थिती होती.



या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रीमंत सुभेदार मल्हारराव होळकर प्रतिष्ठानचे संदीप गायकवाड, दत्तारावं हातकडके, माऊली मिसाळ, आदित्य मिसाळ,गणेश मिसाळ,आकाश रिकामे, संजय काळे, अविनाश हातकडके, राजेश गायकवाड,रामा मिसाळ, सुनील धायगुडे, राहुल बनसोडे, संतोष मिसाळ,प्रथमेश काळे, आशिष शेंडगे,वैभव काळे, यांनी परिश्रम घेतले.

राहत वेल्फेअर फाउंडेशनचा उपक्रमास चांगला प्रतिसाद

# टेंभुर्णी येथील रक्तदान शिबिरात ७३ युवकांचे रक्तदान



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील सेवाभावी संस्था राहत वेल्फेअर फाउंडेशन तर्फे आयोजित रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शनिवारी येथील बस स्थानक परिसरात आयोजित या शिबिरात तब्बल ७३ युवकांनी रक्तदान केले. या शिबिरात गाव व परिसरातील मुस्लिम युवकांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेऊन उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. रक्तदान केलेल्या सर्व रक्त बॅगा नूर हॉस्पिटल बदनापूर येथील ब्लड बँकेत संग्रहित केल्या गेल्या. या शिबिरासाठी नूर हॉस्पिटल च्या डॉ फौजीया खान यांच्या नेतृत्वाखाली डॉ. बुशरा पारेख, करामत खान, राहील खान, इद्रीस पटेल, शेख अखिल, शेख साहिल, शेख जाहेद, मिर्झा अतिक, युसुफ शेख आदींच्या टीमने परिश्रम घेतले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी राहत वेल्फेअर फाउंडेशनचे अध्यक्ष मोहम्मद सगीर यांच्यासह शेख आसिफ, तौसिफ सिद्दिकी, खाजा बागवान, इरफान शेख, सत्तार बागवान, अफरोज शेख, जुनेद बागवान, शेख वसीम, मोहम्मद तालेब, आवेज बागवान, शेख इरफान, शेख समीर आदींनी पुढाकार घेतला.

चौकट-रक्तदान म्हणजे जीवदान होय. धर्मग्रंथ कुराण मध्ये सांगितले आहे की ज्याने एकाचे प्राण वाचविले त्याने संपूर्ण मा मानवतेचे प्राण वाचविले. यासाठी रक्तदानाने एखाद्याचे प्राण वाचविण्याचे भाग्य आपल्याला मिळत असते राहत वेल्फेअर फाउंडेशन मागील तीन वर्षापासून दरवर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन करीत आले आहे. यात सर्व धर्मीयांसह मुस्लिम तरुण मोठ्या संख्येने सहभागी होत असतात. या रक्ताचा उपयोग परिसरातील गोरगरीब रुग्णासाठी विनामूल्य केला जातो.

पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त मंठा येथे आमदार लोणीकर यांच्या हस्ते ३५० महिलांचा सन्मान

# स्वराज्याच्या संकल्पनेला पुढे नेण्यात आणि मराठा साम्राज्याच्या विस्तार करण्यात होळकर घराण्याचे भरीव योगदान - आ. बबनराव लोणीकर

**मंठा । प्रतिनिधी -** अहिल्यादेवींच्या न्यायप्रियतेची ख्याती त्यांच्या राज्याच्या सीमेपलीकडे पसरली होती. त्यांच्या या पद्धतीमुळे राज्यात स्थिरता आणि समृद्धी आली. त्यांच्या प्रजेला त्यांच्यावर पूर्ण विश्वास होता, ज्यामुळे सामाजिक सलोखा वाढला. इतर शासकही त्यांच्याकडून शासन आणि न्यायदानाबाबत सल्ला घेत असत. त्यांच्या या प्रगतिशील दृष्टिकोनामुळे त्या एक आदर्श शासक म्हणून ओळखल्या गेल्या. अहिल्यादेवी होळकर यांच्या न्यायदानाची पद्धत ही खुल्या दरबार, धर्म आणि नीतिमत्तेच्या तत्त्वांवर आधारित निर्णय, आणि पुनर्वसनावर केंद्रित होती. त्यांनी आपल्या व्यवस्थेत समावेशकता आणि सर्वसमावेशकता आणली, ज्यामुळे प्रजेमध्ये विश्वास आणि सुरक्षिततेची भावना निर्माण झाली. त्यांच्या न्यायप्रियतेची ख्याती दूरवर पसरली आणि त्यांचा हा वारसा आजही लोकांना प्रेरणा देत आहे. असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा परतुर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांनी केले.

राजमाता महाराणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त मंठा येथील वैशाली मंगल कार्यालयात आयोजित कर्तबगार महिलांच्या सन्मान सोहळ्या प्रसंगी उपस्थित सन्माननीय कर्तबगार महिलांना मार्गदर्शन करताना बोलत होते. या कार्यक्रमात मंठा तालुक्यातील प्रत्येक गावात सकारात्मकतेने उत्कृष्ट कार्य करणाऱ्या मंठा व जालना ग्रामीण तालुक्यातील सुमारे ३५० महिलांचा सन्मान यावेळी महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. या प्रसंगी व्यासपिठावर उपविभागीय अधिकारी पदमाकर गायकवाड, जालना जिल्हा परिषदेचे पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजपूत, मंठा तहसीलदार सोनाली जोंधळे, जालना तहसीलदार छाया पवार, मंठा गटविकास अधिकारी तांगडे, मंठाच्या माजी नगराध्यक्ष पार्वतीताई बोराडे, नगरसेविका यमुना दवणे, मीरा मोरे, जयश्री पवार महिला व बालकल्याण अधिकारी घोडके व श्री वाघमारे यांची उपस्थिती होती.

राजमाता महाराणी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची त्रिशताब्दी जयंती महाराष्ट्र सरकारने राज्यभरात प्रशासनाच्या वतीने साजरी करण्याचा घेतलेल्या निर्णयाबद्दल माजी मंत्री परतुर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस उपमुख्यमंत्री अजितदादा पवार मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचे आभार आपल्या भाषणात व्यक्त केले. पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याच्या विस्तारात राजमाता महाराणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे योगदान महत्त्वपूर्ण होते. जरी त्यांचा काळ शिवाजी महाराजांच्या निधनानंतरचा असला आणि त्यांनी थेट सैन्याच्या विजयांमध्ये भाग घेतला नसला, तरी त्यांनी प्रशासकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात केलेल्या कार्यामुळे मराठा साम्राज्याच्या विस्ताराला अप्रत्यक्षपणे मदत झाली. अहिल्यादेवी होळकर यांनी माळवा प्रांतावर कुशलतेने राज्य केले आणि स्वराज्याच्या मूल्यांचा आदर राखून मराठा साम्राज्याच्या सीमांचे संरक्षण व विकास केला.

अहिल्यादेवी होळकर या इंदूरच्या होळकर घराण्याच्या शासक होत्या आणि त्यांनी माळवा प्रांतावर आपल्या प्रशासकीय कौशल्याने राज्य केले. त्यांच्या काळात माळवा हा मराठा साम्राज्याच्या प्रभावाखाली होता. त्यांनी तेथील प्रशासनात सुधारणा करून कायदा आणि सुव्यवस्था राखली. यामुळे मराठा साम्राज्याच्या उत्तरेकडील सीमांवर स्थैर्य आले. हे स्थैर्य मराठा साम्राज्याच्या विस्तारासाठी महत्त्वाचे ठरले, कारण यामुळे मराठ्यांना इतर दिशांमध्ये सैन्याच्या कारवाया करण्याची संधी मिळाली. अहिल्यादेवींनी आपल्या राज्यात अनेक धार्मिक आणि सामाजिक कार्ये केली. त्यांनी काशी, प्रयाग, उज्जैन, नाशिक यांसारख्या तीर्थक्षेत्रांमध्ये मंदिरे, घाट आणि विश्रामगृहे बांधली. तसेच, त्यांनी धर्मशाळांची स्थापना आणि प्रजेच्या कल्याणासाठी विविध योजना राबवल्या. या कार्यांमुळे मराठा साम्राज्याच्या सांस्कृतिक आणि धार्मिक प्रभावाचा विस्तार झाला. त्यांच्या प्रशासनाची आणि मराठा संस्कृतीची ख्याती साम्राज्याच्या सीमेपलीकडे पसरली, ज्यामुळे स्वराज्याच्या संकल्पनेला बळ मिळाले. असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.




अहिल्यादेवींनी आपल्या राज्यात मराठा सैनिकांना प्रशिक्षण दिले आणि त्यांच्या माध्यमातून मराठा साम्राज्याच्या सैन्याला बळकटी प्रदान केली. त्यांनी आपल्या सैन्याचा उपयोग माळव्याच्या संरक्षणासाठी केला, ज्यामुळे मराठा साम्राज्याच्या उत्तरेकडील सीमांवर सुरक्षितता वाढली. तसेच, त्यांनी मराठा साम्राज्याच्या अंतर्गत संघर्षात मध्यस्थी करून साम्राज्याच्या एकात्मतेला प्रोत्साहन दिले. यामुळे मराठा साम्राज्याच्या विस्ताराला चालना मिळाली. अहिल्यादेवींनी आपल्या प्रशासनात छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापित केलेल्या स्वराज्याच्या मूल्यांचा आदर केला. त्यांनी प्रजेच्या कल्याणावर भर दिला, न्यायप्रियता दाखवली आणि धर्माच्या तत्त्वांवर आधारित शासन केले. त्यांच्या या कार्यामुळे स्वराज्याच्या संकल्पनेला पुढे नेण्यात आणि मराठा साम्राज्याच्या सीमेपलीकडे त्याचा प्रसार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

यावेळी गणेशराव खवणे, भाजपा तालुकाध्यक्ष नितीन राठोड सतीशराव निर्वळ वैजनाथ बोराडे नागेशराव घारे अजय अवचार विलास घोडके दीपक बोराडे शेषनारायण दवणे प्रसादराव बोराडे अमोल मोरे, गणेश चव्हाण, संतोष बोराडे, रामकिसन मुसळे, कैलास चव्हाण, बाळासाहेब तौर, तानाजी शेंडगे महेश पवार नारायण कणसे सोनाजी जाधव नरेंद्र ताठे प्रसादराव गडदे बाबाजी जाधव राजेभाऊ खराबे प्रकाश मुळे जानकीराम चव्हाण विठ्ठलराव काळे अशोक आप्पा सोनटक्के कानोबा थोरात प्रकाश गबाळे नवनाथ चट्टे शरद पाटील भगवान देशमुख नितीन सरकटे रामकिसन बोडके आबासाहेब सरकटे सिद्धेश्वर सरकटे गजानन देशमुख दत्ताराव कांगणे नवनाथ खंदारे कृष्णा खंदारे गजानन शिंदे जितेंद्र सरकटे एकनाथ जाधव सुभाष चव्हाण परमेश्वर शिंदे रमेश वायाळ दतराव खराबे बाळासाहेब इंगळे द्वारकादास चिंचाने नितीन चव्हाण विष्णू गायकवाड लतीश शिंदे सुभाषराव बागल स्वरूप सानप गणेश मोरे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.